# पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी,
# पुणे-१८
# अग्निशामक विभाग
# ( मॅन्युअल क्र.७ )

## धोरणात्मक बाबी निश्चित करण्यासाठी अथवा त्यांची अमलबजावणी संबंधात जनतेचे प्रतिनिधित्व अथवा सल्लामसलत हेतुर्थ अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा तपशिल

( मॅन्युअल क्र.७ )

- अग्निशामक विभागाकडुन FAQ’s तयार करण्यात येऊन ते मनपा वेबसाईटवर प्रसारित करण्यात आले आहेत.
- अग्निशामक विभागाशी संबंधित नागरिकांना आपले अभिप्राय, सुचना, तक्रार इत्यादी देण्याकरीता विभागाकडील अधिका-यांचे नाव, दुरध्वनी क्रमांक व ई-मेल व महानगरपालिका बेबसाईटवर देण्यात आलेले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अग्निशामक विभाग

## वारंवार (सर्वसाधारण) विचारले जाणारे प्रश्न (FAQ'S)

- आगीसारखी दुर्घटना घडल्यास कुठे संपर्क करावा व अग्निशामक विभागाची सेवा कशी प्राप्त करावी?

  उत्तर - आपत्कालिन दुरध्वनी क्र – १०१ (टोल फ्री) वर संपर्क साधू शकता.

  महापालिकेअंतर्गत असणा-या अग्निशामक केंन्द्राची माहिती व संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे.

| अक्र | अग्निशामक केंन्द्र | दुरध्वनी क्र. | भ्रमनध्वनी क्र. |
|---|---|---|---|
| १ | जन.अरुणकुमार वैद्य मुख्य अग्निशमन केंद्र, पिंपरी<br>दिनांक २०/७/१९७३ स्थापना | 27423333<br>27422405<br>27420212 | 9922501475<br>7030908991 |
| २ | राजमाता जिजाऊ, उप अग्निशमन केंद्र, भोसरी, दिनांक २६/१/१९८८ स्थापना | 8669692101 | 9922501476<br>7030908992 |
| ३ | उप अग्निशमन केंद्र, प्राधिकरण<br>दिनांक ६/३/१९९७ स्थापना | 27652066 | 9922501477<br>7030908993 |
| ४ | उप अग्निशमन केंद्र, रहाटणी<br>दिनांक १५/८/१९९९ स्थापना | 8669693101 | 9922501478<br>7030908994 |
| ५ | उप अग्निशमन केंद्र, तळावडे<br>दिनांक २४/३/२०१६ स्थापना | 27690101 | 9552523101<br>7030908996 |
| ६ | उप अग्निशमन केंद्र, चिखली<br>दिनांक ०१/१०/२०१८ स्थापना | 27494849 | 8669694101<br>7030908995 |
| ७ | उप अग्निशमन केंद्र, थेरगांव<br>दिनांक ७/३/२०२२ स्थापना | 7768090101 | 7768090101 |
| ८ | मोशी अग्निशमन केंद्र दिनाक<br>१५/५/२०२३/ २४/४/२०२३ | 7264943333<br>7387778101 | 8600694101 |



- आग लागल्याची वा अन्य आपत्कालीन माहिती / खबर अग्निशामक दलास कशी द्यावी ?

  उत्तर - • आग लागल्याचे निश्चित ठिकाणाचा व्यवस्थित पत्ता सांगणे .

  - जवळची खुण सांगणे.
  - आगीचे स्वरुपा विषयी माहिती देणे
  - आपले नाव व फोन क्रमांक सांगणे.



- अग्निशामक दलाची सेवा कोणत्या कारणांकरीता घेता येईल?

उत्तर - जेथे जिवित व वित्त हानी होऊ शकते व आपत्तीजनक परिस्थिती निमार्ण होऊ शकते, अशा ठिकाणी अग्निशामक दलाची मदत घेता येईल. उदा. आग दुर्घटना घडल्यास, घरगुती गॅस सिलिंडरमधून (L.P.G.) गॅस गळती झाल्यास, वायु गळती झाल्यास, व्यक्ती पाण्यात बुडाल्यास, व्यक्ती अडकल्यास, वादळ वा-याने झाड पडल्यास किंवा त्यामुळे वाहतुकीस अडथळा होत असल्यास, झाड धोकादायक असल्यास, पुर परिस्थिती निर्माण झाल्यास ई.

- अग्निशामक विभागाकडुन दिल्या जाणा-या सेवेसाठी किती शुल्क आकारले जाते?

  उत्तर – पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये आग दुर्घटना किंवा आपत्कालिन दुर्घटनेकरीता कोणत्याही प्रकारचे अग्निशामक सेवा शुल्क आकारले जात नाही. तथापी महानगरपालिका हद्दीबाहेर अग्निशामक सेवा शुल्क आकारणी केली जाते.

पिं.चिं.म.न.पा. हद्दीमध्ये व हद्दीबाहेर पुढीलप्रमाणे अग्निशामक सेवा शुल्क आकारणी केली जाते.

| अक्र | सेवा | हद्दीमध्ये | हद्दीबाहेर |
|---|---|---|---|
| १ | अग्निशामक सेवा / रेस्क्यु वर्दी ( प्रती वाहन, प्रती शिफ्ट ) | नाही | निवासी र. रु. ५,०००/-<br>बिगर निवासी र. रु. ८,०००/- |
| २ | पाणी फवारणी ( प्रती वाहन ) | र. रु. ५,०००/- | र. रु. १०,०००/-<br>(१० किमी पर्यंत फक्त) |
| ३ | अग्नि बंदोबस्त स्टॅन्ड बाय डयुटी ( प्रती वाहन, प्रती शिफ्ट ) | र. रु. ५,०००/- | र. रु. ८,०००/- (५० किमी पर्यंत)<br>र. रु. १०,०००/- (५० किमीच्या पुढे) |



- अग्निशामक विभाग कोणकोणत्या प्रकारची सेवा पुरवते?

  उत्तर –
  - अग्निशामक सेवा.
  - आपत्ती बचाव व सुटका सेवा.
  - आपत्ती नियंत्रण व व्यवस्थापन सेवा.
  - कार्यक्रमांकरीता अग्निशामक वाहन स्टॅन्डबाय डयुटी. (शुल्क सेवा)
  - अग्निशामक बचाव व सुटका प्रशिक्षणे. (शुल्क सेवा)
  - ना हरकत दाखला प्रमाणपत्र. (शुल्क सेवा)

- आग लागलेली असतांना मी अग्निशमन दलास कशा प्रकारे मदत करू शकतो ?

  उत्तर -
  - आग लागल्याची खबर योग्य पद्धतीने कंन्ट्रोलरुमला दया व आगीचे निश्चित ठिकाण त्याना सांगा.
  - जिथे आग लागली आहे अशा ठिकाणी अग्निशामक दलाच्या वाहनास व्यवस्थित, जलद व अचूक पोहोचता यावे याकरीता मुख्य रस्त्याच्या ठिकाणी येवून थांबा.
  - आगीचा बंब सायरन वाजवित दुर्घटनेच्या ठिकाणी जात असतांना त्यास रस्ता मोकळा करुन दया.

- अग्निशामक विभागाकडुन कोणत्या प्रकारची ना हरकत प्रमाणपत्रे देण्यात येतात?

  उत्तर –
  - इमारत मंजुरीकामी तात्पुरता व सुधारीत अग्निशामक ना हरकत प्रमाणपत्र
  - इमारत अग्निशामक व्यवस्थाकामी पक्का अग्निशामक ना हरकत प्रमाणपत्र
  - हॉटेल अग्निशामक ना हरकत प्रमाणपत्र (नविन व नुतनीकरण)
  - रॉकेल विक्री अग्निशामक ना हरकत प्रमाणपत्र (नविन व नुतनीकरण)
  - कारखाना व कंपनी अग्निशामक ना हरकत प्रमाणपत्र (नविन व नुतनीकरण)
  - एल. पी. जी गॅस बँक अग्निशामक ना हरकत प्रमाणपत्र (नविन व नुतनीकरण)
  - पेट्रोल पंप अग्निशामक ना हरकत प्रमाणपत्र (नविन व नुतनीकरण)
  - सिनेमागृह/मल्टीप्लेक्स अग्निशामक ना हरकत प्रमाणपत्र (नविन व नुतनीकरण)
  - सायबर कॅफे अग्निशामक ना हरकत प्रमाणपत्र (नविन व नुतनीकरण)
  - आग वर्दी प्रमाणपत्र.

- अग्निशामक ना हरकत दाखला मिळणेकामी कोठे अर्ज करावा?

  उत्तर – अग्निशामक ना हरकत दाखला मिळणेकामी नागरी सुविधा केंन्द्र, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुख्य कार्यालय इमारत, पिंपरी – १८ येथे आवश्यक कागदपत्रांसह अर्ज दाखल करावा.



- अग्निशामक ना हरकत दाखला मिळणेस किती कालावधी लागतो?

  उत्तर – अग्निशामक ना हरकत दाखला प्रकारावर अवलंबुन आहे.
  तथापी किमान १५ दिवसांचा व कमाल ३० दिवसांचा कालावधी याकरीता लागु आहे.




- मनपा अग्निशामक विभागाचे कार्यालयीन कामकाज हे कोणत्या अधिनियमाखाली चालते ?

उत्तर – महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ मधिल कलम २८५ ते २८९ अन्वये चालते.

- मला कोणत्या कारणांकरीता अग्निशामक ना हरकत दाखला घेणे जरूरी आहे. ?

उत्तर – तुम्ही मालक/ विकसक/ बांधकाम व्यवसायिक / Architect , असाल व तुम्ही बांधत असलेली इमारत ही,

अ ) संपुर्ण निवासी वापर इमारतीची उंची जमीनीपासुन १५ मीटर पेक्षा अधिक असल्यास, तुम्हास प्रथम इमारत प्लॅन मंजूरी तात्पुरता अग्निशामक ना हरकत दाखला व बांधकाम पुर्ण झाले नंतर व तेथे अग्निशमन यंत्रणा लावलेनंतर, अंतिम (पक्का) अग्निशामक ना हरकत दाखला घेणे जरूरी आहे.

ब) अन्य सर्व अ निवासी वाणिज्य (Commercial ), शैक्षणिक (Educational), औद्योगिक (Industrial), ई असेल व बांधकामाचे क्षेत्रफळ ५०० चौ. मीटर. पेक्षा अधिक व उंची १५ मीटर पेक्षा कमी व जास्त असली तरी, अशा बांधकामांना प्रथम प्लॅन मंजूरी तात्पुरता व नंतर अंतिम (पक्का) अग्निशामक ना हरकत दाखला घेणे जरूरी आहे.

क) रॉकेल, हॉटेल, मॉल, मल्टीप्लेक्स, सिनेमागृह, पेट्रोल पंप, एल.पी. गॅस गोडावुन, ५० खांटापेक्षा अधिक क्षमतेचे रुग्णालये, औद्योगिक कंपन्या (एम.आय.डी.सी. वगळुन) ई. व्यावसायिकांना अग्निशामक विभागाकडील स्वतंत्र व्यवसाय अग्निशामक ना हरकत दाखला घेणे जरूरी आहे.

ड) शहरामधील मोकळया पटांगणात भरविणेत येणारे कार्यक्रम, प्रदर्शन, मेळावे, मनोरंजन खेळणी, सर्कस ई.कार्यक्रमांकरीता हंगामी अग्निशामक ना हरकत दाखला घेणे जरूरी आहे.

- मला अग्निशामक ना हरकत दाखल्यांचे नुतनीकरण करणे जरूरी आहे काय? असल्यास कोणते दाखले करावेत.

उत्तर – व्यवसायाकरीता घेतलेले अग्निशामक ना हरकत दाखल्यांचे वार्षीक अथवा त्रैवार्षीक नुतनिकरण आवश्यकते अग्निशमन शुल्क भरुन करणे आवश्यक आहे. परंतू इमारत बांधकामाकरीता घेतलेल्या अग्निशामक ना हरकत दाखले हे एक वेळेचे कायमस्वरुपी असल्याने त्यांचे नुतनीकरण करणेची आवश्यकता नाही.

- अग्निशामक ना हरकत दाखला करीता किती शुल्क आकारले जाते?

  उत्तर – अग्निशामक ना हरकत दाखला सेवा शुल्क हे वेगवेगळया ना हरकत दाखल्यांकरीता वेगवेगळे आहे. अधिक माहिती करीता PCMC WEB SITE वर (१७ मॅन्युअल्स) भेट दयावी. त्यामधील मॅन्यअल क्र. १० मध्ये ना हरकत दाखला शुल्क तक्ता दिला आहे.

- अग्निशामक विभागाव्दारे कोणकोणत्या प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते?

  उत्तर –
  - अग्निशामन सुरक्षा.
  - आपत्तीतुन बचाव व सुटका.
  - आपत्कालिन व्यवस्थापन व नियंत्रण.

- अग्निशामक विभागाव्दारे प्रशिक्षणाकरीता किती फी आकारली जाते?

  उत्तर –
  - खाजगी संस्था :- र. रु. १५००/- प्रती सत्र. (साधारणत: १.३० मिनिटे)
  - सरकारी संस्था :- र. रु. २०००/- प्रती सत्र. (साधारणत: १.३० मिनिटे)
  - शाळा संस्था :- र. रु. २०००/- प्रती सत्र. (साधारणत: १.३० मिनिटे)
  - अग्निशामक केंन्द्रामध्ये फक्त शाळांकरीता मोफत प्रशिक्षण दिले जाते.

- अग्निशामक विभागाव्दारे दिले जाणारे प्रशिक्षणाचे स्वरुप काय आहे?



उत्तर – ➢ <u>अग्निशामक सुरक्षा -</u>

  - आगीची तांत्रीक व्याख्या.
  - आग लागण्याची तांत्रीक कारणे व आगीचे वर्ग.
  - आग विझवण्याच्या तांत्रीक पद्धती.
  - आग विझवण्याची माध्यमे व साधने .
  - अग्निशमनचे विविध उपकरणे, त्यांची रचना व वापर.
  - आग लागल्यास घ्यावयाची काळजी व दक्षता.
  - आगीपासुन स्वत:चा व इतरांचा बचाव करण्याच्या पद्धती व उपाययोजना.

➢ <u>आपत्तीतून बचाव व सुटका -</u>

  - आपत्तीची व्याख्या व त्याबाबतची व्यापक माहिती.
  - आपत्तीचे प्रकार.
  - आपत्ती घडण्याची सर्वसाधारण कारणे व त्यावरील उपाययोजना.
  - अपत्तीमध्ये स्वसंरक्षणाच्या पद्धती.
  - आपत्तीमध्ये वापरावयाची सुधारीत व अद्यावत साधने, उपकरणे व त्यांचा वापर.
  - आपत्ती टाळण्याचे सर्वसाधारण दक्षता.

➢ <u>आपत्कालिन व्यवस्थापन व नियंत्रण</u> -

  - आपत्तीचे विविध प्रकार.
  - आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ माहिती.
  - आपत्ती व्यवस्थापन संदर्भातील केस स्टडीजचा अभ्यास.
  - आपत्ती आराखडा माहिती व अंमलबजावणी.
  - आपत्ती नियंत्रणाकरीता वापरामधील साधनसामग्रीचा अभ्यास व प्रत्यक्ष वापर प्रात्याक्षिक.

- अग्निशमन विषयक केंद्र अथवा राज्याचा कोणता विशेष कायदा लागू आहे काय ?

उत्तर – होय, अग्निशमन विषयक महाराष्ट्र राज्य सरकारचा महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ हा कायदा लागू आहे.

- अग्निशमन विषयक कायद्यामधिल अग्निशमन यंत्रणा व जिवित सुरक्षितता बाबत मुख्य

तरतुदी काय आहेत.

उत्तर – महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे

अ) कलम ३ (१) प्रमाणे अग्निशमन यंत्रणा अनुज्ञेय असणा-या इमारतीचे मालक/ भोगवटादार यांनी अशा सर्व इमारतींमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा नियमाप्रमाणे लावणे बंधनकारक आहे, व ही यंत्रणा कोणत्याही क्षणी वापराकरीता कायमस्वरुपी दुरूस्त व कार्यक्षम ठेवणे बंधनकारक आहे.

ब) कलम ३ (३) प्रमाणे लावणेत आलेली अग्निशमन यंत्रणा बाबत " लायसन्स प्राप्त अभिकरण " (Fire License Agency ) यांचे कडील "बी" फॉर्म वर्षाचे प्रत्येक जानेवारी व जूलै महिन्यात असे दोन वेळा मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

क) कलम ५(२) नुसार अग्निशामक दलाचे अधिकारी इमारतीमधील अग्निशमन यंत्रणेची पहाणी / तपासणी करणेस आल्यास, सदर यंत्रणा तपासणीकामी संपुर्ण सहकार्य करणे.

- मनपा अग्निशामक विभागाचे कार्यालयीन कामकाज हे कोणत्या अधिनियमाखाली चालते ?

उत्तर – महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ मधिल कलम २८५ ते २८९ अन्वये चालते.

- मला कोणत्या कारणाकरीता अग्निशामक ना हरकत दाखला घेणे जरूरी आहे. ?

उत्तर – तुम्ही मालक/ विकसक/ बांधकाम व्यवसायिक / Architect असाल व तुम्ही बांधत असलेली इमारत

अ ) संपुर्ण निवासी व इमारत उंची जमीनीपासुन १५ मीटर पेक्षा अधिक असल्यास तुम्हास प्रथम इमातर प्लॅन मंजूरी तात्पुरता अग्निशामक ना हरकत दाखला व बांधकाम पुर्ण झालेवर तेथे अग्निशमन यंत्रणा लावलेनंतर अंतिम (पक्का) अग्निशामक ना हरकत दाखला घ्यावा लागेल.

ब) इमारतीची उंची १५ मीटर पेक्षा कमी अथवा जास्त असल्यास परंतु इमारतीचा वापर हा निवासी व्यतिरीक्त वाणिज्य (Commercial ), शैक्षणिक (Educational), औद्योगिक (Industrial), ई वापराकरीता असेल व बांधकामाचे क्षेत्रफळ ५०० चौ. मीटर. पेक्षा पुढे असल्यास असा बांधकामांना प्रथम प्लॅन मंजूरी तात्पुरता व नंतर अंतिम (पक्का) अग्निशामक ना हरकत दाखला घेणे जरूरी आहे.

क) रॉकेल, हॉटेल, मॉल, मल्टीप्लेक्स, सिनेमागृह, पेट्रोल पंप, एल.पी. गॅस गोडावुन, ५० खांटापेक्षा अधिक क्षमतेचे रुग्णालये, औद्योगिक कंपनी (एम.आय.डी.सी. वगळुन) ई. व्यावसायिकांना अग्निशामक विभागाकडील स्वतंत्र व्यवसाय अग्निशामक ना हरकत दाखला घेणे जरूरी आहे.

ड) शहरामधील मोकळया पटांगणात भरविणेत येणारे कार्यक्रम, प्रदर्शन, मेळावे, मनोरंजन खेळणी, सर्कस ई.कार्यक्रमांकरीता हंगामी अग्निशामक ना हरकत दाखला घेणे जरूरी आहे.

- मला अग्निशामक ना हरकत दाखल्यांचे नुतनीकरण करणे जरूरी आहे काय? असल्यास कोणते

उत्तर – व्यवसायाकरीता घेतलेले अग्निशामक ना हरकत दाखल्यांचे वार्षीक अथवा त्रैवार्षीक नुतनिकरण आवश्यकते अग्निशमन शुल्क भरुन करणे आवश्यक आहे. परंतू इमारत बांधकामाकरीता घेतलेल्या अग्निशामक ना हरकत दाखला हे एक वेळेचे कायमस्वरुपी असल्याणे त्यांचे नुतनिकरण करणेची आवश्यकता नाही.

- अन्य संस्था माहिती –

| | |
|---|---|
| जिल्हा अधिकारी कार्यालय आपत्ती व्यवस्थापन अधिकारी | ☏ 020 - 26122114 |
| यशदा आपत्ती निवारण कक्ष , | ☏ 020 - 25608000, 2568100 |
| नागरी संरक्षण दल (सिव्हिल डिफेंन्स) | ☏ 020 - 26361072, 2551000 |
| होमगार्ड | ☏ 020 - 25636086 |
| सिदापोडी ,बॉम्ब डिस्पोझल स्कॉड .ई.एम. | ☏ 020 - 27145998 |
| पोलीसपुणे ,स्कॉड बॉम्ब डिस्पोझल , | ☏ 020 - 26208377 |
| एनतळेगांव ,एफ .आर .डी . | ☏ 02114 - 231509 |
| पुणे अग्निशमन केंद्र, भवानी पेठ | ☏ 020 – 26450453 |
| औंध अग्निशमन केंद्र, पुणे मनपा | ☏ 020 – 25883098 |

- <u>औद्योगीक अग्निशामक सेवा -</u>
  - पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील –

| क्र. | कंपनीचे नाव व पत्ता | अग्निशामक वाहनांची संख्या | दुरध्वनी |
|---|---|---|---|
| १ | मे. टाटा मोटार्स लि. MIDC, पिंपरी | फायर टेंडर ३ | ☏ 5613772 |
| २ | मे. टाटा मोटार्स लि. चिंचवड | फायर टेंडर २ | ☏ 2635555 |
| ३ | मे. बजाज ऑटो लि. मुंबई पुणे रोड | फायर टेंडर १ | ☏ 27406224 |
| ४ | मे. फोर्स मोटार्स लि. मुंबई पुणे रोड | फायर टेंडर १ | ☏ 27476381 |
| ५ | मे. सेन्चुरी एन्का लि. MIDC, भोसरी | फायर टेंडर १ | ☏ 66127300 |

- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेरील -

| अक्र | कंपनीचे नाव व पत्ता | अग्निशामक वाहनांची संख्या | दुरध्वनी |
|---|---|---|---|
| १ | मे. बजाज ऑटो लि., चाकण. | फायर टेंडर – १ | ☎ 02135-259301 |
| २ | मे. वोल्क वॅगन लि., चाकण. | फायर टेंडर – २ | ☎ 02135-661132<br>☎ 661111 (कंन्ट्रोल रुम) |
| ३ | M.I.D.C अग्निशामक सेवा, हिंजवडी, फेज – १. | फायर टेंडर – १ | ☎ 020-22933101, 22934101 |
| ४ | M.I.D.C अग्निशामक सेवा, हिंजवडी, फेज – ३. | फायर टेंडर – १ | ☎ 020-20272722, 20272744 |
| ५ | M.I.D.C अग्निशामक सेवा, चाकण. | फायर टेंडर - १ | ☎ 02135-203500 |
| ६ | मे. H.P.C.L. बुस्टर स्टेशन, तळेगांव. | फायर टेंडर - १ | ☎ 02114-222784, 287035 |
| ७ | मे. जनरल मोटर्स, तळेगांव. | फायर टेंडर - १ | ☎ 02114-669911 (कंन्ट्रोल रुम) |
| ८ | मे. महिंन्द्रा व्हेईकल मॅन्यु.को.लि. चाकण. | फायर टेंडर - २ | ☎ 7387001598 |




- <u>अग्निशामक आगीचे प्रकार (वर्ग) साधने वापर तक्त –</u>

| आगीचा प्रकार | इंधन (पदार्थ) | वॉटर टाईप | फोम टाईप | $Co_2$ | DCP | ABC |
|---|---|---|---|---|---|---|
| A (घन पदार्थ) | उदा. कागद, लाकुड, कोळसा, कपडा, ई. | ✓ | ✓ | × | × | ✓ |
| B (द्रव पदार्थ) | उदा. पेट्रोल, वॉर्निश, पेंन्ट, ऑईल, ई. | × | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| C (वायुजन्य पदार्थ) | उदा. LPG, CNG ऍसिटीलीन, ई. | × | × | ✓ | ✓ | ✓ |
| D (धातु पदार्थ) | उदा. मॅग्नेशिअम, जस्त, सोडीअम, ई. | × | × | × | ✓ | × |

- अग्निशामक साधने वापरण्याच्या पद्धती -

- ABC अग्निशामक उपकरणे वापरणेची पद्धती -
  - हवेच्या दिशेने उभे रहा. सुरक्षित अंतरावर उभे रहा.
  - सेफ्टी पीन काढा.
  - डिस्चार्ज नोझल आगीच्या दिशेस पकडा.
  - स्क्वीज ग्रीप दाबा.
  - आगीवर थेट मारा करा.







- $CO_2$ अग्निशामक उपकरण वापरणेची पद्धती
  - हवेच्या दिशेने उभे रहा.
  - सुरक्षित अंतरावर उभे रहा.
  - सेफ्टी पीन काढा.
  - डीस्चार्ज हॉर्न आगीच्या दिशेस पकडा.
  - डीस्चार्ज वॉल डावीकडे फीरवून चालु करा.
  - आगीवर थेट मारा करा.










## काय करावे अथवा काय करु नये
## (DOS & DONTS)



### सर्वसाधारण आग दुर्घटने समयी काय करावे अथवा काय करु नये (DOS & DONTS)

| हे करा (✓) | हे करु नका (✕) |
|---|---|
| • "आग" "आग" ओरडुन इतरांना सावध करा.<br>• विद्युत प्रवाह बंद करा.<br>• आगीमध्ये धुराचा त्रास टाळणेकरीता रुमाल ओला करुन नाकाला बांधा.<br>• आगीच्या सुचना देणारे जवळचे (Manual Call point) बटन दाबा.<br>• जवळपास असलेल्या अग्निशामक उपकरणाचा (फायर एक्स्टींग्युशरचा) वापर करा.<br>• धुराच्या खोलीत अडकल्यास रांगत बाहेर या.<br>• इमारतीमधुन बाहेर पडण्याचे मार्ग बंद झाले असल्यास बाल्कनी, रिफ्युज एरीया, गच्ची अशा सुरक्षित ठिकाणी येवुन थांबा व मदतीकरीता हाक मारा.<br>• आग लागल्यावर अग्निशामक दलास १०१ नंबर वर फोन करुन सुचना द्या. | • आग लाल्यावर घाबरुन जावु नका.<br>• आगपासुन बचाव करण्यासाठी पलंग, बाथरुम, कपाट, यामध्ये लपुन बसु नका.<br>• बहुमजली इमारतीत आगीच्या वेळी जिन्याचा वापर करावा. लिफ्टचा वापर करु नका.<br>• जिन्याने उतरतांना धावपळ व धक्काबुक्की करु नये. जलदपणे चाला.<br>• झोपतांना धुम्रपान करु नका.<br>• धुरामध्ये विनाकारण ज्वलनयशील, धोकादायक वा विनावापराचे साहीत्य ठेवु नका. |



### विद्युत आग (इलेक्ट्रीक फायर) - (DOS & DONTS)

| हे करा (✓) | हे करु नका (✕) |
|---|---|
| • मेन स्विच बंद करा.<br>• DCP, ABC, CO2 या फायर एक्स्टींग्युशरचा वापर विद्युत आग विझविणेकरीता करा.<br>• विद्युत उपकरणे वापरतांना सॉकेट गरम झाले तर उपकरण ताबडतोब स्विच ऑफ करा व त्वरीत इलेस्ट्रीशियन कडुन वायरींग तपासुन घ्या.<br>• विद्युत उपकरणे व संच मांडणीचे आर्थिंग करा.<br>• इलेक्ट्रीक वायर्सचे जोडणी उघडे ठेवु नका, कनेक्टर्स वापरा.<br>• शॉर्ट सर्किट टाळण्याकरीता (MCB) Miniature Circuit Breaker विद्युत वायरींगमध्ये वापर करा.<br>• वर्षातुन एकवेळा सर्व विद्युत उपकरणांची विद्युत निरीक्षकाकडुन तपासणी करुन घ्या. | • आग विझविणेकरीता विद्युत उपकरणांवर पाण्याचा वापर करु नका. त्यामुळे तुम्हास शॉक बसु शकतो.<br>• एका इलेक्ट्रिकल सॉकेटमध्ये अनेक प्लग लावुन ओव्हर लोड करु नका.<br>• एक्स्टेंशन बोर्डवर जास्त क्षमतेचे (हाय ऍम्पीअर उपकरणे लावु नका)<br>• कपडे ईस्त्री करतांना ईस्त्री चालु अथवा कपडयांवर ठेवुन इतरत्र जावु नका.<br>• इलेक्ट्रिक गिझर ओल्या हाताने हाताळु नका.<br>• कारपेट खालुन इलेक्ट्रिक वायर्स सप्लाय नेऊ नका. |



स्वयंपाक घरात आग दुर्घटनेवेळी – (DOS & DONTS)

| हे करा (✓) | हे करु नका (×) |
|---|---|
| • गॅस, स्टोव्ह सुरु असतांना किचनमध्येच थांबा.<br>• टॉवेल्स, पेपर, प्लास्टीकि आणि इतर ज्वालाग्राही वस्तु गॅस, स्टोव्ह पासुन दुर ठेवा<br>• मुलांना ओढता येवु नये अशा प्रकारे रिकाम्या भांडयांची हॅडल्स उलटी ठेवा.<br>• स्टोव्हचे बर्नश्र स्वच्छ ठेवा. त्यावर साठलेली काजळी पेट घेवु शकते.<br>• वापरात नसेल तेव्हा स्टेव्ह व गॅस सिलेंडर मेन वॉन रेग्युलेटरपासुन बंद करा.<br>• स्वयंपाक घरातील एक तरी खिडकी अथवा खिडकीचा भाग शक्यतो उघडा ठेवा (धोकादायक गॅस बाहेर जाणेकरीता)<br>• रात्री झोपणेपुर्वी सर्व दिवे विझवावेत.<br>• घर बंद करुन बाहेर पडण्यापुर्वी सर्व दिवे व बटन बंद करावित. | • स्वयंपाक करतांना सैल कपडे घालु नये.<br>• गॅस स्टोव्हच्या वरच्या बाजुला स्वयंपाकाचे साहित्य किंवा भांडी ठेवु नका. ती काढते वेळी तुमच्या कपडयांना आग लागु शकते.<br>• स्वयंपाक घरात शक्यतो फ्रीज ठेवु नका. |



**एल.पी.जी. सिलींडरचा सुरक्षित वापर - (DOS & DONTS)**

| हे करा (✓) | हे करु नका (×) |
|---|---|
| • बर्नरला जोडणारी गॅस टयुब स्वच्छ ठेवा.<br>• नळीमध्ये छिद्र नाहीत किंवा तिला तडे गेलेले नाहीत त्याची तपासणी करा.<br>• गॅसचा वास नेहमीपेक्षा जास्त येत असल्यास गॅस गळती आहे असे समजावे.<br>• नेहमी LPG स्टोव्ह हा सिलेंडरपेक्षा वरच्या पातळीवर ठेवा.<br>• गॅस गळती होत असल्याचा संशय असल्यास, गॅस स्टोव्ह तसेच सिलेंडर व्हॉल्व तोबडतोब बंद करा.<br>• एल.पी.जी. वायु बाहेर जाणेकरीता सर्व दरवाजे आणि खिडक्या उघडा.<br>• त्वरीत सहाय्याकरीता अग्निशामक दलास व एल. पी. जी गॅस सेवा पुरवठादारास संपर्क | • गॅस गळती तपासण्याकरीता कधीही माचिस काडी पेटवुन पाहु नका<br>• कोणतेही इलेक्ट्रीक बटन चालु किंवा बंद करु नका. कारण बटनामधील अगदी छोटयाशा ठिणगीमुळेही आग लागु शकते.<br>• पहाटे/सकाळी उठल्याबरोबर स्वयंपाक घरातील खिडकी उघडल्याशिवाय गॅस चालु करु नका.<br>• सिलेंडरला आग लागली असता आगीच्या ज्वाला विझवू नका. फक्त सिलेंडरवर पाणी मारुन तो थंड ठेवण्याचा प्रयत्न करावा.<br>• स्नानघरामधील एल.पी.जी. गॅस गिझर गरम पाण्याकरीता चालु असतांना स्नानघरातील |

| | |
|---|---|
| करा.<br>• आग लागलेल्या सिलेंडरवर पाण्याचा मारा करा.<br>• फक्त गॅस गळती होत असल्यास सिलेंडर व्हॉलची प्लास्टिक कॅप त्यावर घट्ट दाबुन बसवा.<br>• शक्य असल्यास गळती झालेल्या गॅस सिलेंडर उचलुन मोकळया जागेत आणुन ठेवा. | हवा खेळती असाव. |


**भुकंप – ( DOS & DONTS)** 

| हे करा (✓) | हे करु नका (×) |
|---|---|
| • भुकंपाचे वेळी घाबरु नका.<br>• वृध्द व्यक्ती, महिला, लहान मुले यांना सर्व प्रथम सुरक्षित ठिकाणी जाणेस मत करा..<br>• गॅसचा रेग्युलेटरचा नॉब,विद्युत प्रवाह, उपकरणे बंद असलेचे खात्री करा.<br>• भुकंपाचे वेळी जमीनीवर झोपावे किंवा टेबल, पलंगाच्या खाली कंपन बंद होई पर्यंत दडुन बसा.<br>• कंपन बंद झाले नंतर इमारतीमधुन बाहेर जाणेसाठी फक्त जीन्याचा वापर करा.<br>• दरवाजा, सिमेंटचे कॉलम जवळ जेथे वजनदार वस्तु पडणार नाही अशा ठिकाणी डोक्यावर हात ठेवुन बसावे.<br>• विद्युत प्रवाह, काचेच्या वस्तु किंवा अवजड, धारदार वस्तु पासुन दुर उभे रहा.<br>• उंच इमारत असल्यास घाबरु नका, शांतता ठेवा,<br>• इमारतीमधुन बाहेर पडणे शक्य नसल्यास इमारतीमधील रिफ्यूज एरियात येऊन थांबावे व मदतीची वाट पहावी.<br>• शक्य असल्यास इमारतीमधुन बाहेर मोकळया सुरक्षित जागी (Assembly Point) थांबावे.<br>• बॅटरी सेलवर चालणा-या रेडीओ, FM आणि ध्वनीवर्धक, भ्रमणध्वनी वरील संदेशव्दारे दिल्या जाणा-या सुचना ऐका. | • इमारतीतून बाहेर पडणे शक्य नसल्यास बाहेर पडण्याचे प्रयत्न करु नका.<br>• लिफ्टचा वापर करु नका.<br>• विद्युत प्रवाह जवळ उभे राहु नका.<br>• अफवांवर विश्वास ठेवु नका.<br>• इमारतीमधुन बाहेर पडताना घाई, गडबड, आरडाओरड करु नका.<br>• दुर्घटनेच्या ठिकाणी जाणे-येणेसाठी दुचाकी, चारचाकी वाहनांचा वापर करु नका. |

## पुर परिस्थिती – ( DOS & DONTS)

| हे करा (✓) | हे करु नका (×) |
| --- | --- |
| • पुर पातळीच्या धोक्याची पहाणी करा.<br>• पुर परिस्थितीत अडकल्यास पोकळ मडकी, हंडे, रिकामे प्लास्टीक बॉटल यांचे सुधारित तराफे बनवुन त्याचा आवश्यकतेनुसार वापर करा.<br>• वृध्द व्यक्ती, महिला, लहान मुले यांना सर्व प्रथम सुरक्षित ठिकाणी हलवण्यास मदत करा.<br>• पूर परिस्थितीत स्थलांतर करते वेळी घरातुन बाहेर पडण्यापुर्वी आपल्या घराचा विद्युत पुरवठा, गॅस पुरवठा, पाण्याचा नळ बंद केल्याची खात्री करा.<br>• विषारी, ज्वलनशिल, पदार्थ, जंतुनाशके ई. घरामध्ये उंच जागी ठेवा.<br>• बॅटरी सेलवर चालणा-या रेडीओ, FM आणि ध्वनीवर्धक, भ्रमणध्वनी वरील संदेशव्दारे दिल्या जाणा-या सुचना ऐका.<br>• सतत पाऊस पडत असलेस रात्रीच्या वेळी अधिक दक्ष रहा.<br>• घरामध्ये प्रथमोपचार, अग्निशमन साधने, आपत्ती बचाव साहित्य जवळ ठेवा. (उदा. बँन्डेज, रोप, टॉर्च, फायर एक्सटिंग्युशर ई.)<br>• आपत्ती निवारण वैदयकीय सेवेचा लाभ घ्या.<br>• दिलेल्या धोका पातळीवर घर बांधा.<br>• उंच सुरक्षित जागा ठरवुन ठेवा.<br>• जलसंधान बांध घाला.<br>• मनपा शासकिय संस्था, अग्निशामक दल, आपत्ती निवारण व्यवस्था, बचाव पथक यांचे सुचनांचे पालन करा व त्यांची मदत घ्या.<br>• नेमूण दिलेल्या सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करा. | • विजेची उपकरणांचा वापर करु नका.<br>• पाण्याची पातळी धोक्यापेक्षा जास्त होईल याची वाट पाहु नका.<br>• पाण्याच्या प्रवाहात पोहता येत नसल्यास पोहण्याचा प्रयत्न करु नका.<br>• विजांचा कडकडाट होत असलेस झाडाखाली, विजेच्या खांबाजवळ किंवा ओल्या ठिकाणी थांबु नका.<br>• तुटलेल्या, पडलेल्या खंडीत झालेल्या विद्युत तारांना हात लावु नका.<br>• उघड्यावर असलेल्या अन्नपदार्थांचे सेवन करु नका. |

## उंच इमारतीत दुर्घटनेवेळी – (DOS & DONTS)



| हे करा (✓) | हे करु नका (✕) |
|---|---|
| • आग लहान स्वरुपाची असलेस जवळील अग्निशामकाचा वापर करा.<br>• खिडक्या व दरवाजे उघडा जेणे करुन धुर बाहेर जाणेस मदत होईल.<br>• चेह-याला ओला रुमाल बांधा.<br>• बाहेर जाणेचे जवळच्या मार्गाने महिला, लहान मुले, वृध्द व्यक्ती यांना सर्व प्रथम सुरक्षित ठिकाणी जाणेस मदत करा.<br>• इमारती बाहेर जाणेस फक्त जिन्याचाच वापर करा.<br>• जिन्याने उतरताना सावकाश परंतू पटपट जलद गतीने चालावे.<br>• इमारतीच्या वरेच्या मजल्यावर आग असलेस, खालच्या मजल्यावर किंवा मोकळया जागी थांबा.<br>• इमारतीत खालचे मजलेवर आग असलेस वरचे मजलेवर किंवा मोकळ्या जागी थांबा.<br>• धुराच्या खोलीत नाकाला ओला रुमाल बांधुन जमिनीलगत रांगत बाहेर या.<br>• दरवाजा, खिडकी मधील फटीमध्ये कपड्याचे बोळे घालून बंद करण्याचा प्रयत्न करा. जेणेकरुन खोलीत धुर भरणार नाही.<br>• बंद दरवाजा आगीचा अंदाज घेवुन व उष्णजा हाताने चाचपुन नंतरच हळुवार दरवाजा उघडा.<br>• अग्निशमन दलाची मदत घ्या. | • इलेक्ट्रिक आग असलेस त्यावर पाण्याचा वापर करु नका.<br>• लिफ्टचा वापर करु नका.<br>• इमारतीमधुन बाहेर निघाले नंतर इमारतीत कोणत्याही कारणास्तव पुन्हा प्रवेश करु नका.<br>• स्टोअर रुम, बाथरुम, संडास, अडचणीच्या ठिकाणी ई. मध्ये लपुन बसु नका.<br>• जिन्याने उतरताना पळापळ, घाई गडबड धक्काबुक्की करु नका.<br>• बंद दरवाजा अचानक उघडु नका. |